IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# विश्वशांती निर्माण केंद्र श्रीक्षेत्र गुरुकुंज मोझरी

डॉ. दिगांबर दत्तात्रय कापसे,

प्राचार्य, समर्थ महाविद्यालय, लाखनी, जिल्हा भंडारा.

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीने, "*वसुधैव कुटुंबकम*"या तत्त्वाचा स्वीकार करून प्रचार करण्याचे कार्य सातत्याने केलेले आहे. भारतात विविध धर्म पंथ संप्रदाय गुण्यागोविंदाने नांदतात याबद्दल सर्व जगात कुतूहल आहे मात्र त्यामागे आपल्या संस्कृतीने जी धरोहर स्वीकारली आहे त्यात याचे रहस्य सामावलेले आहे ज्याप्रमाणे विविध धर्म पंथांमधील प्रबोधनकारांनी या विचारधारेला बळकटी दिली त्याच प्रमाणे भारतात अनेक संत परंपरेने त्याला जोड दिली महाराष्ट्र तर संतभूमी म्हणून ओळखला जातो. सर्व जगात शांतता नांदावी, विश्वबंधुभाव टिकावा, सर्वांचे मनोरथ पूर्ण व्हावे यासाठी "*पसायदान*" मागणारे संतश्रेष्ठ माऊली ज्ञानेश्वर याच महाराष्ट्रात जन्माला आले तर सामाजिक अनिष्ट रूढी परंपरांवर आसूड ओढणाऱ्या "*अभंग*" रचना करणारे संत तुकाराम याच महाराष्ट्रात जन्माला आले. महाराष्ट्रातील संतपरंपरा ही कधीही खंडित झाली नाही ती अविरतपणे चालत राहीली यात अनेकांनी आपले योगदान दिले. विसाव्या शतकात हा विचार प्रवाह पुढे नेण्याचे कार्य विदर्भातील दोन महंतानी केला आहे. यात संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी विश्वशांती निर्माण केंद्र उभारले जिथे विश्वबंधुत्वाची ऊर्जा अखंडपणे मिळत आहे. हे केंद्र आधुनिक जगाचे तीर्थक्षेत्र बनले आहे ते म्हणजे गुरुकुंज मोझरी.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे कार्य व गुरुकुंज मोझरी आश्रम**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना "राष्ट्रसंत" ही पदवी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ राजेंद्र प्रसाद यांनी दिली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ज्याप्रमाणे समाज प्रबोधनाचे कार्य केले त्याचप्रमाणे त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सुद्धा योगदान दिले आहे महात्मा गांधींच्या प्रभावाने त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात सुद्धा भाग घेतला मात्र त्यांचा मूळ पिंड भारतीयांमध्ये विश्वत्वाची भावना रुजावी याकरिता सर्व धर्म समभाव हे तत्व सर्व भारतीयांनी मनापासून स्वीकारावे याकरिता त्यांनी आपली साठ वर्ष कार्य केले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी खंजेरीच्या साह्याने भजन करून लोक जागृती घडवून आणली. त्यांची भजन राष्ट्रपती भवनात सुद्धा आयोजित करण्यात आली होती. आपल्या भजनामार्फत स्वातंत्र लढ्यात भारतीयांना चेतविण्याचे कार्य सुद्धा राष्ट्रसंतांनी केली राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपला भजन भाषणातून सर्व भारतीय जनतेमध्ये राष्ट्रभक्ती जागृत केली त्याचाच परिणाम म्हणून अनेक ठिकाणी उठाव घडवणारे आष्टी चिमूर ही त्याची उदाहरणे देता येतील यावेळी त्यांचे गाजलेले भजन," *झाड, झेडूले, शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना, पत्थर सारे बॉम्ब बनेंगे, नाव लगेगी किनारे*" या भजनाने तर स्वातंत्र लढ्यात एक नवे चैतन्य निर्माण झाले.

भारताला खऱ्या अर्थाने सशक्त बनवायचं असेल तर भारतामधील ग्राम म्हणजेच खेडे याचा विकास होणे गरजेचे आहे हे तुकडोजी महाराजांनी ओळखले व त्याकरिता सर्व ग्राम रचना बदलून टाकण्याच सामर्थ्य असणाऱ्या "*ग्राम गीतेची*" रचना त्यांनी केली. ग्रामगीता म्हणजे संपूर्ण मानव जातीचे कल्याण जात सामावली आहे असा अनमोल ठेवा ग्रामगीतेमध्ये आलेले सुमारे 41 विषय सर्व व्यापक आहे महिलांची प्रगती, गावातील राजकारण, तरुणांचे कार्य, मूल्य शिक्षण, तरुणांकडून असलेल्या अपेक्षा अशा अनेक विषयांवर अभ्यासपूर्ण लेखन तुकडोजी महाराजांनी करून ठेवले आहे. भगवद्गीतेने जसा इतिहास घडवला त्याहीपेक्षा आधुनिक काळाला बदलणारे सशक्त माध्यम म्हणजे "ग्रामगीता" होय.

विश्वशांती निर्माण करण्याकरिता सर्व नागरिकांमध्ये विश्वात्मक भाव निर्माण करण्याचे कार्य तुकडोजी महाराजांनी केले विश्व स्नेह का ध्यान धरे सबका सब सन्मान करे याला अनुसरून सर्वांमध्ये विश्वभाव निर्माण झाला पाहिजे त्याचा प्रसार करण्याकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सन 1935 मध्ये गुरुकुंज मोझरी येथे श्री गुरुदेव सेवा आश्रमाची स्थापना केली व त्या माध्यमातून समाजकार्य सुरू केले संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात जे मागितले होते, "*भुता परस्परे जडो मैत्र जीवांचे*" हे तत्व प्रत्यक्ष साकार करण्याचे

कार्य केले या आश्रमाचे, "*सबके लिए खुला है मंदिर यह हमारा मतभेद को भुला है मंदिर ये हमारा*" हे ब्रीद आहे तसेच येथील स्वागत गीत वैशिष्ट्यपूर्ण आहे, "*आओ कोई भी पंथी आवो कोई भी धर्मी*" या स्वागत गीताला अनुसरून येथे, "*सबका भला हो जग मे यही कामना हमारी*" या ध्येयानुसार कार्य चालते. या गुरुकुंज आश्रमात कोणालाच मज्जाव नाही सर्व धर्मपंथाचे हे तीर्थक्षेत्र बनले आहे सर्व धर्माचे प्रतीक म्हणजे श्रीक्षेत्र गुरुकुंज मोझरी आश्रम इथे सर्वांनाच सारखा मान सर्वांच्या देवतांना, साधुसंतांना, पीर मुल्ला मौलवी, धर्मगुरु सर्वांना सारखेच स्थान आहे. गुरुकुंज आश्रमात प्रवेश करतात प्रत्येकाच्या मनात विश्वात्मक भाव जागृत झाल्याशिवाय राहत नाही येथून मानवाला वेगळीच स्फूर्ती व ऊर्जा मिळते त्यामुळे गुरुकुंज आश्रम मोझरी हे विश्वशांती निर्माण करणारे अखंड ऊर्जा स्रोत बनले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कार्याने प्रभावित होऊन श्री क्षेत्र गुरुकुंज मोझरी ला दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद तत्कालीन देशपातळीवरील राजकीय नेते सामाजिक संघटनांची दिग्गज ही ऊर्जा मिळवण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या हयातीत येऊन गेलेत आजही ही ऊर्जा मिळवण्यासाठी मान्यवर येथे येतात गुरुकुंज मोझरी आश्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन शासनाने सुद्धा गुरुकुंज मोझरी आश्रमास अ दर्जाचे तीर्थक्षेत्र म्हणून घोषित केले आहे तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्याची दखल घेऊन शासनाने मध्य भारतात 1923 मध्ये स्थापन झालेल्या नागपूर विद्यापीठाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव देऊन नामकरण केले आहे तसेच विद्यापीठामध्ये तुकडोजी महाराज अध्यासन स्थापन करून राष्ट्रसंताच्या साहित्याचा अभ्यास करण्याची सोय केलेली आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी गुरुकुंज आश्रमाविषयी असे लिहिले आहे की, "*आवडतो मज कण-कण इथला, न सुटे प्रेम मनाचे मज वेडची गुरुकुंजाचे*" येथे दररोज सामुदायिक प्रार्थना व ध्यान केले जाते गुरुकुंज आश्रमांकडून अनेक प्रकल्प उपक्रम राबविले जातात यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी एक "अस्थीकुंड" तयार केला या कुंडामध्ये देशभरातील 34 नद्यांचे जल टाकण्यात आले व येथे आपल्या नातेवाईकांच्या अस्थी विसर्जनासाठी काशी किंवा दूरच्या ठिकाणी न जाता येथेच विसर्जित करावे अशी व्यवस्था केली. याच अस्थी कुंडात डॉ. राजेंद्र प्रसाद, इंदिरा गांधी, जयप्रकाश नारायण अशा अनेक जणांच्या अस्थी विसर्जित करण्यात आलेल्या आहेत आजही आजही या ठिकाणी तो उपक्रम चालू आहे.

**उपसंहार**

आधुनिक काळात वैज्ञानिक, सामाजिक, धार्मिक अशा तीर्थ स्थळांची निर्मिती झालेली आहे विसाव्या शतकात जगात विश्वबंधुत्व निर्माण करण्यासाठी राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्र संघटना अशा जागतिक पातळीवर व्यवस्था निर्माण झाल्या परंतु जोपर्यंत जगातील मानवाच्या मनात विश्वात्मक भाव निर्माण होत नाही तोपर्यंत या व्यवस्था केवळ औपचारिक व्यवस्था म्हणून राहणार आहेत याची जाणीव ठेवत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी विश्वबंधुत्व निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारा भाव निर्माण करण्याचे कार्य आयुष्यभर केले यातून सर्वप्रथम, "*या भारतात बंधुभाव नित्य वसु दे*" अशी प्रार्थना करून कार्य केले हेच कार्य पुढे नेताना जागतिक धर्म परिषदेत ठणकावून सांगितले की, "*हर देश मे तू, हर भेष मे तू, तेरे रूप अनेक तू एकही है*" यामुळे विश्वातील सर्व मानव एकाच ईश्वराची लेकरे आहेत हे जागतिक व्यासपीठावर सांगण्याचे कार्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी केले व आपले कार्य अखंडपणे चालत राहावे म्हणून गुरुकुंज मोझरी आश्रमाची स्थापना हेतू पुरस्सर केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सुरू केलेले कार्य आता पुढे नेण्याची जबाबदारी आमची आहे.

**संदर्भ**

1) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील मूल्यविचार टाले प्रफुल्ल अशोक, साई ज्योती प्रकाशन नागपूर 2020
2) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सहस्रबुद्धे प्र.ग. श्री भारत भारती प्रकाशन नागपूर 2013
3) ग्रामगीता- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
4) राष्ट्रसंत जीवन - गीतामृत डॉ. रा. श. ठोसर